POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३५४ ● मुंबई, शुक्रवार, २५ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ‘मराठी माणसांना आपटून मारु’

## म्हणणाऱ्या दुबेंना महाराष्ट्राच्या महिला खासदारांनी दाखवला इंगा

**■मुंबई । प्रतिनिधी,**

राज्यातील हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर सुरू झालेल्या वादात विनाकारण उडी घेऊन 'मराठी माणसा'ला डिवचणारे भारतीय जनता पार्टीचे झारखंडमधील खासदार निशिकांत दुबेंना बुधवारी मराठी खासदारांनी धडा शिकवल्याचं चित्र पाहायला मिळालं. संसद भवनात त्यांना अचानक गाठून घेराव घालत वादग्रस्त विधानांचा जाब विरोधी पक्षांच्या महिला खासदारांनी विचारला. 'जय महाराष्ट्र' च्या घोषणांनी संसद भवनाची लॉबी दणाणून गेली अन् दुबे यांना तेथून चक्क काढता पाय घ्यावा लागला.




राज्यामध्ये पहिल्या इयत्तेपासून त्रिभाषासूत्रीच्या माध्यमातून हिंदी लादण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत विरोधी पक्षांपैकी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनं आणि राज ठाकरेंच्या शिवसेनेनं थेट रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्याचा इशारा दिला. या इशाऱ्यानंतर ५ जुलै रोजी हिंदीच्या सक्तीविरोधात मुंबईत दोन्ही ठाकरे बंधुंच्या पक्षाने संयुक्त मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली. मात्र त्यापूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्रिभाषासूत्रीचा शासन आदेश मागे घेत असल्याची घोषणा केली. यानंतर पाच जुलै रोजी वरळीमधील डोम येथे झालेल्या संयुक्त जल्लोष मेळाव्यात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंनी मराठीसंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली. याच मेळाव्यावर बोलताना दुबेंचा तोल सरकला आणि त्यांनी मराठी तसेच महाराष्ट्राबद्दल वादग्रस्त विधानं केली.

**दुबे काय म्हणालेले?**

जाणूनबुजून मराठी न बोलणाऱ्या परप्रांतीयांविरोधात राज्यात वातावरण तापले असताना, मनसेचे अध्यक्ष राज ठाकरेंनी बिहारला यावे, तेथे त्यांना 'पटक-पटक के मारेंगे' असे आव्हान दुबे यांनी एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना दिले होते. 'महाराष्ट्र आमच्या पैशांवर जगतो' अशी दर्पोक्तीही दुबेंनी केली होती. याच दुबेंना बुधवारी मराठी महिला खासदारांनी खिंडीत गाठले. विरोधकांच्या गदारोळामुळे लोकसभेचे कामकाज तहकूब झाल्यानंतर वर्षा गायकवाड, शोभा बच्छाव, प्रतिभा धानोरकर या काँग्रेसच्या खासदार दुबे यांना शोधत होत्या. दुबे लॉबीमध्ये येताच तिघींनी त्यांना घेराव घातला आणि त्यांच्या विधानांबाबत जाब विचारला.

**महिला खासदार दुबेंना काय म्हणाल्या?**

''मराठी लोकांना मारण्याची भाषा कशी करू शकता? तुम्ही आपटून आपटून कुणाला आणि कसे मारणार? कसली ही तुमची अर्वाच्च भाषा ? तुमचे वागणे-बोलणे योग्य नाही... मराठी भाषकांविरोधातील तुमची ही अरेरावी आम्ही खपवून घेणार नाही'' अशा शब्दांत गायकवाड यांनी दुबेंना सुनावले. यानंतर या महिला खासदारांनी 'जय महाराष्ट्र' अशी घोषणाबाजी केली. अचानक झालेल्या या साऱ्या प्रकारामुळे दुबे गोंधळून गेले आणि त्यांनी तिथून काढता पाय घेतला.

## माणिकराव कोकाटेंबाबत काय निर्णय? राष्ट्रवादीच्या बड्या नेत्याचा मोठा गौप्यस्फोट

## मंत्रिमंडळात मोठा फेरबदल... कुणाला मिळणार डच्चू?

**■मुंबई । प्रतिनिधी,**

कँटिन कंत्राटदारांना मारहाण, जितेंद्र आव्हाड आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर, हनी ट्रॅप, कृषीमंत्र्यांचा रमी वाद यामुळे राज्य सरकार अडचणीत आले आहे. एका मागून एक प्रकरणं समोर येत आहेत. विरोधक राळ उडवत आहेत. त्यामुळे जनमाणसात सरकारची प्रतिमा डागळत असल्याचा आरोप होत आहे. या सर्व घडामोडींवर मंत्रिमंडळात मोठा फेरबदल होण्याचा आणि प्रगती पुस्तकाआधारे काहींना डच्चू मिळण्याचे सूतोवाच राष्ट्रवादीच्या बड्या नेत्याने केले आहे. काय आहे तो दावा?

**ऑडीट झाल्यानंतर कुणाला डच्चू?**

मुख्यमंत्र्यांनी १०० दिवसांचा कार्यक्रम दिला होता, त्यानुसार मंत्र्यांच्या कामाचं ऑडिट झालंय. कोण मंत्री कसा काम करतो, काय करोत याचं ऑडीट पूर्ण, यानुसार ऑडीटमध्ये फेल झालेल्या मंत्र्यांमध्ये बदल होतील. मंत्री माणीकराव कोकाटे यांच्यावरील आरोपाच्या पार्श्वभुमीवर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे वरिष्ठ नेते धर्मरावबाबा आत्राम यांचे मंत्रिमंडळात बदलाचे संकेत दिले आहेत.

**कोकाटे यांना आत्राम यांचा टोला**

मी त्या तुलनेत तरुण नेता, माज्या कार्यशैलीनुसार माझं वय ३०-३५ आहे. नवीन मंत्री असताना काही शिकायचं आहे, असा टोला त्यांनी कोकाटे यांना लगावला. मी पाच वेळा आमदार राहिलो, मंत्री राहलो, चांगल्या शाळेत शिकलो. आम्हाला माहित आहे. कसं वागायचं मानसन्मान कसा ठेवायचा, आम्हाला



**मंत्रिमंडळात मोठा फेरबदल**

मंत्रिमंडळात बदल होईल, असं वातावरण सध्या दिसत आहे. काही बदल होतील. मंत्रिमंडळात काही बदल होतील, कारण एनर्जी असलेले मंत्री हवे, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना परफॉर्मन्स हवा आहे, असे संकेत आत्राम यांनी दिले. त्यामुळे येत्या काही दिवसात मंत्रिमंडळात नवीन चेहरे दिसतील. खांदापालट होईल. काही मंत्र्यांना डच्चू मिळेल असे म्हटले जात आहे.

माहित आहे, असा चिमटा त्यांनी काढला. मंत्री असताना जबाबदारी असते, कोड ऑफ कंडक्ट असतात. तसं वागायला हवं. मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या बाबत उपमुख्यमंत्री अजित पवार निर्णय घेतील, असे ते म्हणाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत संभाव्य उमेदवारांची यादी तयार करण्यात आली आहे. प्रत्येक सर्कलमध्ये संभाव्य चार उमेदवारांची यादी तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आमची बुथकमिटी, स्थानिक बांधणी सुरु असल्याचे ते म्हणाले. तर उपमुख्यमंत्री अजित पवार पूर्व विदर्भाचा दौरा करणार असल्याची माहिती धर्मरावबाबा आत्राम यांनी दिली.

## मुख्यमंत्री फडणवीसांसमोरच दिल्लीत विद्यार्थ्यांचं आंदोलन



**■मुंबई । प्रतिनिधी,**

राज्यात सध्या हिंदीचा मुद्दा चांगलाच तापला आहे. पहिलीपासून हिंदीची सक्ती नको, अशी भूमिका महाराष्ट्रातील अनेक पक्ष आणि संघटनांची आहे. मनसेन या विरोधात मोठं आंदोलन उभारलं होतं, त्यानंतर शिवसेना ठाकरे गटानं देखील या आंदोलनात उडी घेतली, दरम्यान महाराष्ट्रात राहून आम्ही मराठी बोलणार नाही, अशी भूमिका घेणाऱ्या इतर भाषिकांविरोधात मनसे, चांगलीच आक्रमक झाल्याचं देखील पाहायला मिळालं. दरम्यान राज्यात हिंदी भाषेच्या मुद्द्यावर दबाव वाढल्यानं अखेर राज्य सरकारने देखील त्रिभाषा सूत्राबाबतचे दोन्ही जीआर मागे घेतले. त्यानंतर मुंबईत विजयी मेळावा पार पडला. हिंदीच्या मुद्द्यावरून राज्यात वातावरण तापलेलं असतानाच आता दिल्लीतून मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे दिल्लीत विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोरच आंदोलन केलं आहे.

## प्रफुल्ल लोढा माणसाच्या वेशात नराधम

## मुंबई-पुण्यात बलात्कार, बालअत्याचाराचे गुन्हे

**■मुंबई । प्रतिनिधी,**

'हनी ट्रॅप'सह अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी मुंबईत दोन ठिकाणी गुन्हा दाखल असलेल्या प्रफुल्ल लोढाचे आणखी प्रताप समोर आलेत. लोढाविरोधात बलात्कार प्रकरणी आणखी एक गुन्हा पुण्याच्या बावधन पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे. एकाच महिन्यात एकापाठोपाठ प्रफुल्लवर गुन्हे दाखल कसे झाले असा सवाल विरोधकांनी केला आहे.

एक बटण दाबेन आणि देशात खळबळ माजेल अशी धमकी देणारा प्रफुल्ल लोढा हा हिस्ट्रीशिटर गुन्हेगार असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. प्रफुल्ल लोढावर अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची धक्कादायक माहिती समोर येऊ लागलीये. लोढावर एकामागून एक दाखल झालेल्या गुन्ह्यांबाबत विरोधकांना संशय आहे. लोढावर गंभीर कलमांतर्गत



- ३ जुलै २०२५ - साकीनाका पोलीस ठाण्यात १६ वर्षांच्या मुलगी आणि तिच्या मैत्रिणीवर अत्याचाराचा गुन्हा
- १४ जुलै २०२५ - अंधेरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अल्पवयीन मुलीवर बलात्कार, हनिट्रॅपच्या कलमांतर्गत गुन्हा
- १७ जुलै २०२५ - पुण्याच्या बावधन पोलीस ठाण्यात नोकरीचं आमिष दाखवून महिलेवर बलात्काराचा गुन्हा

गुन्हे दाखल होण्यासाठी जुलै महिनाच सापडला का असा सवाल एकनाथ खडसेंनी केला आहे. प्रफुल्ल लोढाबाबत गिरीश महाजनांनी पुन्हा स्पष्टीकरण दिलंय. प्रफुल्ल लोढासारखे अनेकजण आपल्यासोबत फोटो काढतात.... प्रत्येक फोटो काढणारा आपला कार्यकर्ता कसा म्हणता येईल असा सवाल गिरीश महाजनांनी केलाय. एवढंच नव्हे तर प्रफुल्ल लोढा वंचितचा उमेदवार असल्याचा नवा दावा त्यांनी केलाय.

प्रफुल्ल लोढा हा छोटा मासा असून मोठा मासा मंत्रिमंडळात असल्याचा खळबळजनक आरोप संजय राऊतांनी केला आहे. प्रफुल्ल लोढाविरोधात एकामागून एक गुन्हे दाखल होणे.... विरोधकांनी सातत्यानं हनी ट्रॅपचे आरोप करणे हे वरवर दिसतंय तसं काही नाही... प्रफुल्ल लोढाकडं अनेक गुपित आहेत का?.... प्रफुल्ल लोढाकडं काही पुरावे आहेत का?... अशी चर्चा या निमित्तानं संपूर्ण राज्यभर सुरु झाली आहे.

## मुंबईच्या सावली बारवरुन महाराष्ट्राचे राजकारण तापलं!

## मंत्री योगेश कदम यांनी आईच्या नावाने डान्सबार सुरु केल्याचा आरोप

**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईच्या कांदिवलीमधील याच सावली बारवरुन सध्या राज्याचं राजकारण तापलंय.. विधानपरिषदेत सावली बारबाबत आरोप करुन शिवसेना वइळचे आमदार अनिल परब यांनी गृहराज्यमंत्री योगेश कदमांना घेरलं. परबांच्या या आरोपांवर संतापलेल्या मंत्री योगेश कदम यांनी थेट हक्कभंग दाखल करण्याचा इशारा दिला.




सध्या महायुती सरकारमधील मंत्री कोणत्या ना कोणत्या कारणामुळे वादात सापडलेत. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाटांच्या राजीनाम्याची मागणी विरोधकांकडून करण्यात येतेय. आता सावली बार आणि जगबुडी वाळू प्रकरणामुळे या यादीत गृहराज्यमंत्री योगेश कदमांची भर पडलीय.. त्यामुळे आता योगेश कदमांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

यावर आईच्या नावाने डान्सबार सुरु करुन पोरी नाचवायला लाज वाटत नाही का असा सवाल अनिल परबांनी केला.

तसंच आपण केलेले आरोप फळक्याच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीच्या आधारे केल्याचा सांगत अनिल परब यांनीही कदम पिता-पुत्रांवर जोरदार निशाणा साधलाय.. मुख्यमंत्र्यांनी गृहराज्यमंत्री योगेश कदमांचा राजीनामा घ्यावा अशी मागणीही परबांनी केली. सावली बार प्रकरणासोबतच जगबुडी नदीतील वाळूचा विषयही अनिल परबांनी समोर आणलाय.

अनिल परबांच्या या आरोपांना रामदास कदमांनीही जशास तसं उत्तर दिलंय. आम्ही डान्सबार चालवणारे नसून फोडणारे आहोत अशा शब्दांत कदमांनी उत्तर दिलं. कदमांनी उद्धव ठाकरेंनाही लक्ष्य केलंय.

## आश्रम शाळेतील भूताचं गूढ काय? विद्यार्थिनी अचानक बेशुद्ध पडली, दातखिळी बसली अन्...

**■जळगाव ।प्रतिनिधी,**

जळगावातील धानोरा इथल्या आदिवासी आश्रम शाळेत भुताच्या अफवेमुळे एकच गोंधळ उडाला आहे. शाळेतील एक मुलगी बेशुद्ध झाल्यामुळे इतर मुली चांगल्याच घाबरल्या. मुलीला भूत दिसल्याची चर्चा गावभर पसरली आणि पालकांनी मुलांना घरी नेण्यासाठी आश्रमशाळेत धाव घेतली. त्यामुळे शाळेत एकच गोंधळ उडाला. दरम्यान बेशुद्ध पडलेल्या मुलीला तातडीनं दवाखान्यात दाखल करुन तिच्यावर उपचार करण्यात आलेत.. आणि त्यानंतर तिला पालकांच्या स्वाधिन करण्यात आलं. जळगावच्या धानोरा येथील आदिवासी विभागाच्या आश्रम शाळेतील तिसरीत शिकणारी मुलगी अचानक बेशुद्ध पडली. कशाला तरी घाबरून ही मुलगी अचानक बेशुद्ध पडली. त्यानंतर तिची दातखीळी बसली असा दावा इतर विद्यार्थ्यांनी केला. या प्रकारामुळं मुलांमध्ये भीती निर्माण होऊन मुली घाबरल्या आहेत. या घटनेनंतर आश्रम शाळेमध्ये शिकणाऱ्या आदिवासी मुलांच्या पालकांनी मुलींना परत घेऊन जाण्यासाठी मोठा गोंधळ घातला आहे. आदिवासी प्रकल्प विभागाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी शाळेला भेट देत पाहणी केली.. घाबरलेल्या सर्व मुलींचे समुपदेशन केले जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. आदिवासी विभागाचे पथक या घटनेची चौकशी करेल चौकशी ते जे काही तथ्य समोर येईल त्यानुसार पुढील कारवाई करण्यात येईल अशी माहिती सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी दिली.



या घटनेनंतर आश्रमशाळेतील जवळपास 100 पेक्षा मुले आणि मुलांना त्यांचे पालक घरी घेऊन गेले आहे. दरम्यान, मुलगी कशाला तरी घाबरली होती त्यानंतर ती बेशुद्ध पडली नव्हती..मुलीला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात येऊन उपचारांनंतर पालकांच्या स्वाधीन करण्यात आले अशी माहिती आश्रम शाळेच्या अधीक्षिका यांनी दिली आहे. मुलींच्या खोलीमध्ये शिक्षक नसल्याने त्या घाबरतात त्यामुळे त्यांच्या खोल्यांमध्ये शिक्षक नियुक्त करावा अशी मागणी पालकांनी केली आहे.

## पुण्यात आमदाराचा भाऊ आणि त्याच्या मित्रांचा तुफान राडा... तमाशा थिएटरवर गोळीबार? डान्स करणारी तरुणी जखमी




**■पुणे। प्रतिनिधी,**

पुण्यात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ झाली आहे. अशातच आता पुण्यात आमदाराचा भाऊ आणि त्याच्या मित्राने राडा घातला आहे. यांनी थिएटरवर गोळीबार करत दहशत माजवण्याचा प्रतयत्न केला. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. या गोळीबारात एक तकुणी जखमी झाली आहे.

पुण्यातील दौंड परिसरात ही घटना घडली. सत्ताधारी महायुतीतील एका आमदाराचा भाऊ आणि त्याच्या मित्रांनी राडा केल्याची माहिती समोर आली आहे. राजकीय पार्श्वभूमी असलेल्या नेत्याच्या कार्यकर्त्यांनी तमाशा थिएटरवर गोळीबार केला. आमदाराच्या भावाच्या मित्राने गोळीबार केल्याची माहिती डान्स करणारी तरुणी जखमी झाल्याची माहिती. यवत पोलिसांकडून घटनेची चौकशी सुरू आहे.दरम्यान, हा कोणत्या आमदाराचा भाऊ आहे? या आमदाराचे नाव काय? याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

**कोयता गँगची दहशत**

पुण्यात कोयता गँगची दहशत दिवसेंदिवस वाढत चालली आहे. कोंढवा परिसरात कोयता गँगने एका टपरी चालकावर हल्ला करत टपरीची तोडफोड केली. एवढ्यावरच न थांबता या आरोपींनी गल्ल्यात हात घालून पैसे काढण्याचाही प्रयत्न केला. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमे-यात चित्रित झाला आहे. धक्कादायक बाब म्हणजे याप्रकरणी अद्याप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. कोयता गँगवर पोलिस कारवाई कधी कारवाई करणार, असा सवाल स्थानिक विचारत आहेत.

## उल्हासनगरमध्ये विनयभंग केलेल्या तरुणींच्या घरासमोर गुंडांची आतषबाजी, याला कायद्याचं राज्य म्हणायचं का?

**■उल्हासनगर। प्रतिनिधी,**

गंभीर गुन्हे करुनही करुनही त्यांची विजयी मिरवणूक निघते. फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचं जंगी स्वागत होतं. जेलमधून सुटूनही जर गुडांचा उन्माद असाच सुरु असेल तर याला कायद्याचं राज्य म्हणायचं का? असा प्रश्न उपस्थित होतोय. कारण उल्हासनगरच्या घटना याला कारणीभूत ठरल्यायत. जामिनावर सुटलेले अट्टल गुन्हेगार सेलिब्रेशन करतानाचा व्हिडीओ समाज माध्यमांमध्ये व्हायरल होतोय. कल्याणच्या आधारवाडी जेलमधून गुंडांची जामिनावर सुटका झाली आणि त्यांच्या पंटर लोकांनी शहरातून चक्क त्यांची जंगी मिरवणूकच काढली.

**दोन तरुणींचा विनयभंग**

यातील एका आरोपीवर तरुणींच्या विनयभंगाचा गुन्हा दाखल आहे.. या आरोपीचं नाव आहे रोहित झा. उल्हासनगर कॅम्प २ मधील रमाबाई टेकडी परिसरात २७ एप्रिल रोजी बिपिन झा, रोहित झा, सोनमणी झा, आणि बिट्टू यादव यांनी एका घरात घुसून दोन तरुणींचा विनयभंग केला. त्यांच्यावर गुन्हा दाखल केल्यानंतर आरोपींना अटक झाली. मात्र कोटार्नं रोहित झा याचा जामीन मंजूर केला आणि १७ जुलैला आधारवाडी जेलमधून त्यांची सुटका झाली.




**गुंडांचा उन्माद राजरोसपणे शहरात सुरु**

उल्हासनगर कॅम्प २ मधील गुंडांनी २७ एप्रिल २०२५ रोजी रमाबाई नगरमध्ये त्यानं दारुच्या नशेत एकावर तलवार आणि लोखंडी रॉडनं मारहाण केली. त्याला अटक करुन तरुंगात डांबलं. मात्र 16 जुलैला तोही जामिनावर सुटला आणि त्याच्या पंटर लोकांनी त्याचंही असं जंगी स्वागत केलं. या गुंडांचा हा उन्माद राजरोसपणे शहरात सुरु आहे. त्यामुळे सामान्य नागरिक या गुंडांच्या दहशतीत आहेत.. घराबाहेर गेलेली तरुण मुलगी सुखरुप घरी परतेल का याची चिंता इथल्या नागरिकांना वाटते..

**दहशत पसरवण्यासाठी सारं काही**

जेलमधून सुटताच त्याच्या टोळीतील गुंडांनी जेलपासून उल्हासनगरपर्यंत त्याची मिरवणूक काढली. हे गुंड इथंच थांबले नाहीत तर ज्या तरुणींचा त्यांनी विनयभंग केला होता तिच्या घरासमोर फटाके फोडत आणि ढोलताशाच्या गजरात विकृत सेलिब्रेशन केलं.. याचा व्हिडिओ काढून ते सोशल मीडियावर व्हायरल केले. दहशत पसरवण्यासाठी हे सारं काही केलं गेलं.

**कायद्याचा आणि पोलिसांचा धाक नाही**

आता हा सगळा प्रकार घडल्यानंतर पोलिसांनी यातील रोहित झा याच्याविरोधात गुन्हा दाखल केलाय. रोहित झा सध्या फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. मात्र तुरुंगातून सुटल्यानंतरही या गुंडांमध्ये एवढी हिंमत येते कुठून. गुन्हा केल्याची जराही लाज न बाळगता या गुंडांचा हा उन्माद हेच दाखवतोय की त्यांना कायद्याचा आणि पोलिसांचा धाक उरलाच नाहीये.

## कॉलेजमध्ये मराठी बोलल्यावरुन वाद

## मराठी विद्यार्थ्याला लाथा बुक्यांसह हॉकी स्टिकने मारहाण

**■वाशी। प्रतिनिधी,**

राज्यात मराठी-अमराठीचा वाद चांगलाच रंगला आहे. कल्याण येथील खासगी रुग्णालयातील रिसेप्शनिस्ट तरुणीला एका परप्रांतीय तरुणाने मारहाण केल्याची घटना काही दिवसांपूर्वीच घडली होती. त्यानंतर वाशीमध्येही असाच एक प्रकार उघडकीस आला आहे. मराठी-अमराठी वादात मराठी विद्यार्थ्यार्ला लाथा-बुक्क्याने व हॉकी स्टिकने मारहाण झाल्याची घटना वाशीत घडली आहे. महाविद्यालयाच्या गेटवरच विद्यार्थ्याला अडवून त्याच्याच वर्गातील विद्यार्थ्यांनी मारहाण केली. या प्रकरणी चार विद्यार्थ्यांवर वाशी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्यात सध्या मराठी - अमराठीचा मुद्दा गाजत आहे. मराठी न बोलण्यावरून ठिकठिकाणी वादाचे, हाणामारीचे प्रकार घडत आहेत. त्यातच मराठी - अमराठीच्या वादाचे लोण महाविद्यालयांपर्यंत देखील पसरले आहे. त्यातून एका मराठी



विद्यार्थ्याला जबर मारहाण झाली आहे.

वाशीतील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये हा वाद झाला. विद्यार्थ्यांच्या व्हाट्सअप ग्रुपमध्ये चॅटिंगदरम्यान मराठी - अमराठीचा वाद उद्भवला होता. त्यातून सूरज पवार (२०) व फैजान नाईक (२०) यांच्यात शाब्दिक वाद झाला होता. त्यातून सोमवारी दुपारी महाविद्यालयाच्या गेटवरच दोघांमध्ये हाणामारी झाली. यामध्ये फैजान व त्याच्या तीन साथीदारांनी सूरजला लाथा बुक्यांसह हॉकीने मारहाण केली. याप्रकरणी वाशी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस अधिक तपास करत आहेत. या प्रकरणात मनसेने देखील उडी घेतली असून वाशी पोलीस ठाण्यात आज भेट देणार आहेत.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# आका खूश झाले असतील!

मुंबई उच्च न्यायालयाने ११ जुलै २००६ रोजी मुंबई लोकल रेल्वेच्या डब्यांमध्ये घडवून आणलेल्या बॉम्बस्फोट प्रकरणात सोमवारी जो निकाल दिला त्यामुळे मुंबई १९ वर्षांनंतर पुन्हा एकदा हादरली आहे. इतकेच नव्हे तर हा अग्रलेख लिहिताना नेमके काय लिहावे, असा प्रश्न आम्हाला पडला आहे, असा अचंबित करणारा हा निकाल आहे. सत्र न्यायालयाने या बॉम्बस्फोट प्रकरणातील १२ आरोपींपैकी पाच आरोपींना फाशीची शिक्षा सुनावली होती, तर बाकीच्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या आरोपींपैकी एकाचा मृत्यू झाला. या आरोपींनी या शिक्षेविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती. या प्रकरणात अतिशय गुंतागुंतीचे आणि त्यात अनेक साक्षीदार तपासावयाचे आणि जबाब नोंदवायचे असल्यामुळे त्यासाठी वेगळ्या खंडपीठाची स्थापना करण्यात आली. गेली १९ वर्षे या प्रकरणावर सुनावणी सुरू होती. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ व आरोपींकडून हस्तगत केलेले साहित्य आणि कबुलीजबाब या तीन आधारांवर हा खटला चालवण्यात आला होता. मात्र, या तिन्ही पातळीवर आरोपींविरुद्धचा एकही गुन्हा पोलिसांना सिद्ध करता आला नाही, असे नमूद करून न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या विशेष खंडपीठाने सत्र न्यायालयाचा निर्णय रद्द केला. सगळ्या आरोपींची निर्दोष सुटका केली. १८९ निरपराधांचे बळी घेणाऱ्या आणि ८२७ जणांना जखमी करणाऱ्या या प्रकरणात न्यायालयाने दिलेल्या निर्णयाबाबत अनेकांनी नाराजी आणि आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. ऐन गर्दीच्या वेळी लोकल रेल्वेमध्ये बॉम्बस्फोट घडवून हाहाःकार उडवून देणाऱ्या घटनेतील जबाबदार म्हणून ज्यांना ताब्यात घेण्यात आले होते, त्यांच्यावर इतका प्रदीर्घ काळ खटला चालवण्यात आला होता, तर मग मुंबई उच्च न्यायालयाने त्या सगळ्यांची थेट निर्दोष मुक्तता करण्याचा निर्णय कसा काय घेतला, असा प्रश्न सर्वसामान्य मुंबईकरांना पडणे साहजिकच आहे. तसेच ज्यांनी आपले नातेवाईक या बॉम्बस्फोटांमध्ये गमावले आहेत, ज्या महिलांनी आपला पती, मुलांनी आपले वडील, वडिलांनी आपला मुलगा किंवा मुलगी गमावली असेल त्यांचा न्यायालयाच्या या निकालामुळे संताप होणे साहजिक आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाबाबत काहींचे असे म्हणणे आहे की, या आरोपींना सत्र न्यायालयाने जी फाशीची आणि जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती, ती कशाच्या आधारावर सुनावली होती? कारण अशी शिक्षा सुनावताना त्या न्यायालयाने काही पुरावे तपासलेच असतील ना? पण हा खटला जेव्हा मुंबई उच्च न्यायालयात गेला तेव्हा त्यासाठी वेगळे खंडपीठ स्थापन करण्यात आले. या खंडपीठाने दिलेल्या निकालाविषयी मुंबईकरांकडून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत असल्या तरी न्यायालय हे भावनेच्या आधारावर निर्णय घेत नाही तर सबळ पुरावे पडताळून पाहिल्यावर निकाल देत असते. या प्रकरणात पोलिसांनी ज्या आरोपींना पकडले होते, त्यांच्या विरोधात त्यांना सबळ पुरावे सादर करता आले नाहीत. न्यायालयाच्या निकालावर अनेकांनी जरी नाराजी व्यक्त केली असली तरी न्यायालयाने जी निरीक्षणे नोंदवली आहेत, त्यात म्हटले आहे की, या आरोपींना शिक्षा देता येईल असे सबळ पुरावे समोर आले नाहीत. साक्षीदारांच्या साक्षी विश्वास ठेवण्यासारख्या नाहीत. स्फोटांच्या १०० दिवसांनंतर साक्षीदारांना आरोपी आठवणे अवघड आहे. स्फोटासाठी वापरण्यात आलेले बॉम्ब ओळखण्यात तपास यंत्रणा अपयशी ठरली आहे. तपास यंत्रणेला बॉम्ब ओळखण्यात आले नाहीत, त्यामुळे सादर करण्यात आलेले पुरावे संशयास्पद आहेत. बॉम्ब, बंदुका, नकाशे आणि संबंधित माहिती जुळून आली नाही.ही एकूण निरीक्षणे पाहिल्यावर असे दिसेल की, या प्रकरणात पोलीस आणि त्यांच्या तपास यंत्रणा, गुप्तहेर यंत्रणा या खऱ्या आरोपींपर्यंत पोहोचण्यात अपयशी ठरलेल्या आहेत. त्यात पुन्हा त्यांनी जे आरोपी पकडले त्यांच्या विषयी त्यांना न्यायालयाला पटतील असे सबळ पुरावे सादर करता आले नाहीत. म्हणजे अजूनही आपल्या देशात अशा प्रकरणात जो तपास केला जातो, त्याचे अद्ययावतीकरण करण्याची गरज आहे, असे वाटते. तसेच जे लोक या तपास यंत्रणेचा भाग असतात, त्यांना अधिक प्रशिक्षणाची गरज आहे. अशा प्रकरणात आरोपी जेव्हा पुराव्याअभावी निर्दोष सुटतात, तेव्हा पोलिसांबाबत नाराजी व्यक्त केली जाते. पण अनेकांचे बळी घेणाऱ्या अशा प्रकरणातील आरोपी तितकेच कडवट आणि खतरनाक असतात, हेही लक्षात घ्यावे लागते. त्यामुळे त्यांना पकडणे अवघड काम असते, त्यासाठी पोलिसांना जीवाची बाजी लावावी लागते. इतकी मेहनत घेऊनसुद्धा आरोपी निर्दोष सुटले तर पोलीस खात्याच्या प्रतिष्ठेचा आणि विश्वासाहर्तेचा प्रश्न असतो. भारताच्या अर्थव्यवस्थेचे इंजिन असलेल्या मुंबईवर अशा प्रकारे जेव्हा विघातक हल्ले होतात, त्यांचा एकूणच विचार केला तर त्यामागील सूत्रे ही शेजारील पाकिस्तानातून हलविलेली दिसतील. १९९३ साली मुंबईत घडवून आणलेले साखळी बॉम्बस्फोट असो, नाही तर २००८ साली कसाब टोळीने जलमार्गाने येऊन मुंबईवर केलेला हल्ला असो. या दोन्ही हल्ल्यांमध्ये अनेक मुंबईकरांचे बळी गेले. या दोन हल्ल्याचे सूत्रधार हे पाकिस्तानातील आहेत हे पुराव्यानिशी सिद्ध झाले, पण २००६ साली लोकल रेल्वेच्या डब्यांमध्ये सात ठिकाणी दहा मिनिटांच्या अवधीत झालेले बॉम्बस्फोट कुणी घडविले, त्याचे कुठले पुरावेच सापडले नाहीत, याचेच मोठे आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही. त्यामुळे हा निकाल पाहिल्यावर मुंबईकर नाराज झाले असले तरी हे बॉम्बस्फोट घडविणाऱ्या हस्तकांचे पाकिस्तानातील आका खूश झाले असतील.

# तपास आणि सरकारी पक्षाच्या त्रुटी दाखविणारा निकाल

मुंबईमध्ये ११ जुलै २००६ रोजी उपनगरीय रेल्वेमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटातील सर्व १२ दोषींची सोमवारी मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष सुटका केली. हा निकाल दिला उच्च न्यायालयाचे न्या. अनिल किलोर आणि न्या. श्याम चांडक यांनी. या निकालाबद्दल सर्वसामान्य नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. विशेष न्यायालयाने दोषी ठरविलेल्या आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाने कशी काय सुटका केली, असा प्रश्न अनेकांना पडला. या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने निकाल देताना काय गोष्टी लक्षात घेतल्या, हे पाहणे महत्त्वाचे आहे.





मुंबईतील २००६ मधील साखळी बॉम्बस्फोटाच्या खटल्यामध्ये सरकारी पक्षाने आरोपींच्या कबुलीजबाबावर मोठा भर दिला होता. पण कोणताही कबुलीजबाब दबावाखाली न येता स्वेच्छेने दिलेला असला पाहिजे. तरच तो ग्राह्य धरला जातो. या खटल्यात सर्व कबुलीजबाब हे स्वेच्छेने दिलेले आहेत आणि ते खरे आहेत, हे न्यायालयापुढे सिद्ध करण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरल्याचा ठपका न्यायालयाने ठेवला. ज्यांचे कबुलीजबाब पुरावे म्हणून न्यायालयात सादर करण्यात आले, त्यापैकी काहींमधील आशय तर एकसारखाच आहे. म्हणजेच एकावरून दुसरा कॉपी करण्यात आला आहे, असे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले.

उच्च न्यायालयाचे सविस्तर निकालपत्र हे ६७१ पानांचे आहे. त्यामध्ये या निष्कर्षाप्रत न्यायालय कसे आले, याचे सविस्तर विवेचन केले आहे. हा संपूर्ण निकाल ज्या एका तत्त्वावर बेतलेला आहे, ते म्हणजे याच १२ व्यक्तींनी हा बॉम्बस्फोट केला, हे न्यायालयाच्या मनात कोणतीही शंका न राहता सिद्ध करण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरला. याचाच अर्थ ज्यांना आरोपी म्हणून तपास अधिकार्यांनी न्यायालयापुढे उभे केले, त्यांनीच हा स्फोट घडवला, हे साक्षी-पुराव्यांच्या आधारावर न्यायालयात सिद्ध करता आलेले नाही.

खटल्याच्या सुनावणीवेळी सरकारी पक्षाने तीन पद्धतीचे पुरावे सादर केले. यामध्ये प्रत्यक्षदर्शी-साक्षीदार, घटनास्थळावरून जप्त केलेल्या वस्तू आणि कबुलीजबाब. सरकारी पक्षाने किंवा तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयात कसे पुरावे सादर करायचे, या संदर्भात कायद्यामध्ये ज्या तरतुदी आहेत, त्यांचे पालन या खटल्यामध्ये झाल्याचे आढळले नाही. हा मुद्दा न्यायालयाने खूप प्रकर्षाने मांडला.

अगदीच उदाहरण द्यायचे झाल्यास कोणत्याही गुन्हेगारी खटल्यामध्ये ओळखपरेड ही खूप महत्त्वाची असते. ओळखपरेड कशी घ्यायची, कुठे घ्यायची, कोणी घ्यायची याची पद्धत ठरलेली असते. देशासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या खटल्यामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी ओळखपरेड घेतली, त्यांना तो अधिकारच नसल्याचा निष्कर्ष उच्च न्यायालयाने काढला. याचाच अर्थ योग्य प्रक्रियेचा अवलंब करण्यात आलेला नाही.

खटल्यामध्ये दोन महत्त्वाचे प्रत्यक्षदर्शी सरकारी पक्षाने न्यायालयापुढे उभे केले होते, ज्यांनी दोन आरोपींना त्यांच्या टॅक्सीमधून चर्चगेटपर्यंत नेले होते. विशेष म्हणजे घटना घडल्यानंतर १०० हून अधिक दिवस उलटल्यावर या प्रत्यक्षदर्शींनी पोलिसांकडे जबाब दिला की त्यांनीच आरोपींना चर्चगेटला नेले. १०० दिवसांचा कालावधी खूप मोठा आहे आणि तो विश्वास ठेवण्यायोग्य वाटत नसल्यामुळे त्याचा उच्च न्यायालयाने विचार केला नाही.

ओळखपरेडवेळी योग्य प्रक्रियेचा अवलंब केला नसल्याने न्यायालयाने ती ग्राह्य धरली नाही. त्यानंतर विशेष न्यायालयात प्रत्यक्षदर्शींनी आरोपींना पाहिले, त्यावेळी घटनेला ४ वर्षे उलटली होती. इथे विषय प्रत्यक्षदर्शींच्या स्मरणशक्तीचा येतो. आरोपींचा चेहरा नीट लक्षात ठेवण्यासाठी दोन्ही प्रत्यक्षदर्शींना पुरेसा वेळ मिळालेलाच नाही, असे आधीच्या घडामोडींवरून दिसून आल्याने ४ वर्षांनंतर ते आरोपींना ओळखू शकत असले, तरी त्या आधारावर त्यांना दोषी ठरविणे योग्य वाटत नसल्याचा निष्कर्ष न्यायालयाने काढला.

ज्या साक्षीदारांनी आरोपींना उपनगरीय रेल्वेमध्ये बॉम्ब ठेवताना पाहिल्याचा दावा केला होता, त्यांनीसुद्धा घटना घडल्यानंतर १०० हून अधिक दिवस उलटल्यावर पोलिसांकडे त्याबद्दल जबाब दिला. एवढी मोठी घटना घडल्यावर १०० दिवस हे साक्षीदार शांत का होते आणि नंतर ते अचानक पोलिसांकडे का गेले, याचा नीट संबंध जुळत नसल्याने न्यायालयाने या पुराव्याबाबतही साशंकता व्यक्त केली.

घटना घडल्यावर एका साक्षीदाराने चौथ्या दिवशी पोलिसांकडे जबाब दिला होता. त्या आधारावर तपास अधिकाऱ्यांनी पहिल्या आरोपीला आणि नंतर इतर आरोपींना अटक केली. ही अटक झाल्यावर चार महिने संबंधित साक्षीदाराला ओळखपरेडसाठी पोलिसांनी बोलावलेसुद्धा नव्हते, यावर न्यायालयाने नेमकेपणाने बोट ठेवले. या विलंबाचे कोणतेही कारण सरकारी पक्षाने दिलेले नाही.

काही प्रत्यक्षदर्शींनी काही आरोपींना घरामध्ये बॉम्ब तयार करताना पाहिल्याचे जबाबात म्हटले होते. पण त्यांनीसुद्धा घटनेला १०० दिवस उलटल्यानंतर हे जबाब दिले होते. विशेष म्हणजे साक्षीदारांपैकी एकाला तपास अधिकार्यांनी संशयित म्हणून ताब्यात घेतले होते. त्यावेळीही त्याने याबद्दल काही सांगितले नाही.

विशेष न्यायालयात त्याने सांगितले की, तो आरोपींपैकी एकाच्या घरात गेल्यावर तिथे काही आरोपी बॉम्ब तयार करत होते. पण जेव्हा त्याची उलटतपासणी घेण्यात आली, त्यावेळी त्याने, आपण नाही, तर आपल्या एका मित्राने आरोपींना बॉम्ब तयार करताना पाहिल्याचे सांगितले. विशेष म्हणजे हे झाल्यावर त्या मित्राला न्यायालयात बोलावून त्याची साक्ष सरकारी पक्षाने घ्यायला हवी होती. पण तसे झालेच नाही. या त्रुटीकडे न्यायालयाने लक्ष वेधले.

घटना घडल्यावर ज्या एका प्रत्यक्षदर्शीने दिलेल्या माहितीच्या आधारावर दोन आरोपींची रेखाचित्रे तयार करण्यात आली होती. त्यालासुद्धा तपास अधिकर्यांनी ओळखपरेडसाठी बोलावलेच नाही. सरकारी पक्षाने त्याला साक्षीदार म्हणून न्यायालयात बोलावले. पण तिथेसुद्धा न्यायाधीशांसमोर त्याला आरोपींना ओळखण्यास सांगण्यात आलेच नाही.

या सगळ्यामुळे या साक्षीदाराच्या साक्षीतूनही पुरावा म्हणून फारसे काही हातात पडत नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. अन्य काही साक्षीदारांनी घटना घडल्यावर लगेचच आरोपींचे वर्णन पोलिसांकडे दिले होते. त्या साक्षीदारांनासुद्धा तपास अधिकाऱ्यांनी ओळखपरेडसाठी बोलावले नाही आणि त्यांना साक्ष देण्यासाठी विशेष न्यायालयातही बोलावण्यात आले नाही. या साक्षीदारांना का बोलावण्यात आले नाही, असा प्रश्नच न्यायालयाने सरकारी पक्षाला विचारला.

तपास अधिकाऱ्यांनी बाॅम्बस्फोटानंतर घटनास्थळावरून विविध वस्तू जप्त केल्या. ज्यामध्ये आरडीएक्स, डिटोनेटर्स यांचाही समावेश होता. या वस्तू पुरावे म्हणून महत्त्वाच्या आहेत. पण त्या घटनास्थळावरून जप्त केल्यावर ज्या पद्धतीने न्यायवैद्यक विभागाकडे पोचवायला पाहिजे, ती पद्धतच पाळण्यात आली नाही. हे पुरावे घटनास्थळावरून गोळा केल्यावर ते व्यवस्थित सील करून न्यायवैद्यक विभागाकडे तपासासाठी पोचवायला हवे होते, पण तसे झाल्याचे दिसत नसल्याने उच्च न्यायालयाने हे पुरावेही ग्राह्य धरले नाहीत.

या संपूर्ण खटल्यामध्ये सरकारी पक्षाने आरोपींच्या कबुलीजबाबावर मोठा भर दिला होता. पण कोणताही कबुलीजबाब दबावाखाली न येता स्वेच्छेने दिलेला असला पाहिजे, तरच तो ग्राह्य धरला जातो. या खटल्यात सर्व कबुलीजबाब हे स्वेच्छेने दिलेले आहेत आणि ते खरे आहेत, हे न्यायालयापुढे सिद्ध करण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरल्याचा ठपका न्यायालयाने नोंदविला.

ज्यांचे कबुलीजबाब पुरावे म्हणून न्यायालयात सादर करण्यात आले, त्यापैकी काहींमधील आशय तर एकसारखाच आहे. म्हणजेच एकावरून दुसरा कॉपी करण्यात आला आहे, असे न्यायालयाच्या निदर्शनास आले. दुसरे म्हणजे कबुलीजबाब देण्यापूर्वी आरोपींचा छळ करण्यात आला होता. कबुलीजबाब देण्यास पोलिसी खाक्याचा वापर करून आरोपींना प्रवृत्त करण्यात आले, हे व्यवस्थितपणे न्यायालयात दाखवून देण्यात बचावपक्ष यशस्वी ठरल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

वर दिलेल्या महत्त्वाच्या मुद्द्यांच्या आधारावर उच्च न्यायालयाने निकाल दिला. तपास अधिकर्यांकडून कशा पद्धतीने तपासात त्रुटी राहिल्या हेच न्यायालयाने निकालातून सप्रमाण दाखवून दिले. लोकभावना काय आहेत, यावर न्यायालये काम करीत नाहीत. न्यायदानाच्या प्रक्रियेत तथ्य, पुरावे, कायद्यातील तरतुदी, वकिलांचे युक्तिवाद, आधी दिलेल्या निकालांचा वापर या सगळ्यालाच अधिक महत्त्व असते.

प्रत्येक न्यायालय ठराविक पद्धतीने या सगळ्यांचा आधार घेत आपला निकाल देत असते. न्यायिक प्रक्रियेमध्ये बारकाईने प्रत्येक गोष्ट बघितली जाते. हा निकाल जरी काही लोकांना पटत नसला, तरी तो न्यायिक चौकटीमध्ये दिलेला आहे. त्यामुळे त्याचा मान ठेवलाच पाहिजे. बाकी दहशतवादविरोधी पथक या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात गेले आहेच, बघूया तिथे काय होते ते...

# महाराष्ट्र कुठे चालला आहे?

महाराष्ट्राच्या लोकशाही परंपरेचा इतिहास गौरवशाली आहे. या राज्याने एक जबाबदार, सुसंस्कृत आणि विधायक राजकारण पाहिलं आहे. त्या महाराष्ट्राचं विधानभवन हे केवळ एक इमारत नाही, तर हे राज्यघटनेच्या मूल्यांचं, जनतेच्या अधिकारांचं आणि संसदीय परंपरेचं मंदिर आहे. मात्र, तीन आठवड्यांच्या पावसाळी अधिवेशनात घडलेल्या घटनांनी या साऱ्या मूल्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण केलं आहे. ज्या वास्तूत कायदे निर्माण होतात, तिथेच कायद्याचं उल्लंघन, गोंधळ, मारामारी आणि गुन्हेगारी वृत्तीचं मुक्त प्रदर्शन झालं. आमदारांच्या कार्यकर्त्यांनी लॉबीतच एकमेकांना मारहाण केली. याच अधिवेशनकाळात सत्ताधारी पक्षाच्या एका आमदाराने अर्धनग्न अवस्थेत आमदार निवासातील उपहारगृहात कर्मचाऱ्याला मारहाण व शिवीगाळ केली. अनेक आमदारांचे बेफाम वर्तन समोर आले. हे सर्व पाहता या अधिवेशनातून जनतेला काही मिळाले का नाही, हे समजेलच; मात्र महाराष्ट्राच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली.



विधानभवनासारख्या संवेदनशील आणि पवित्र लोकशाही स्थळी जे दृश्य आज आपण पाहतो, ते अत्यंत लाजिरवाणं आहे. राज्यातील गोरगरीब, शेतकरी, बेरोजगार युवक, महिला, यांना त्यांच्या अत्यावश्यक कामांसाठी दिवसभर विधानभवनाच्या फाटकाजवळ उभं राहावं लागतं. अनेक वेळा त्यांना मंत्री किंवा अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचण्याची गरज असते. पण सुरक्षारक्षक त्यांना आत येऊ देत नाहीत. बाहेर बंदोबस्तावर असलेले पोलीस त्यांच्यावर ओरडतात, त्यांना हाकलून देतात, कधी कधी धक्काबुक्की करतात. हे चित्र प्रत्येक अधिवेशनकाळात दिसते.

या अधिवेशनात एक महिला आणि तिचा मुलगा पहिल्या दिवसापासून रस्त्याच्या कडेला गेटजवळ बसलेले आहेत. तिची १७ एकर जमीन आ. गोपीचंद पडळकर यांच्या जवळच्या लोकांनी हडपल्याचे सांगत ती बिचारी न्यायाची याचना करत आहे. तीन आठवड्यांचे अधिवेशन संपले, मोक्काचे आरोपी विधानभवनात फिरून गेले, पण त्या माऊलीला न्याय मिळणे दूर, तिला कोणी विधानभवन परिसरातही येऊ दिलं नाही. दुसरीकडे, राजकीय पक्षांचे काही कार्यकर्ते कम गुंड, मोक्काचे आरोपी, जे केवळ नेते-आमदारांच्या जवळचे असतात, ते मात्र बिनधास्त गेटमधून आत शिरतात. त्यांना कोणत्याही अडथळ्याविना सहज प्रवेश मिळतो. गुंड प्रवृत्तीचे, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले कार्यकर्तेही विधीमंडळाच्या संपूर्ण इमारतीत पर्यटन करत असतात. फोटो, व्हिडीओ, इंस्टाग्राम रील्स यांचे शूटिंग सुरू असते. संपूर्ण विधानभवन परिसरात ही 'चमकोगिरी' अत्यंत मुक्तपणे सुरू असते.

### राजकीय संस्कृतीचा घसरलेला स्तर

कधी काळी महाराष्ट्राच्या विधीमंडळात यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, शंकरराव चव्हाण, भाई उद्धवराव पाटील, गणपतराव देशमुख, प्रा. एन. डी. पाटील, भाई केशवराव धोंडगे, विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंडे यांसारखे नेते होते. या सगळ्यांनी आपापल्या पक्षांच्या विचारधारेशी निष्ठा राखत, पण अत्यंत सभ्य, सुसंस्कृत पद्धतीने विधीमंडळात काम केलं. त्यांनी सरकारच्या चुकीच्या धोरणांचा जोरदार विरोध केला, जनतेच्या प्रश्नांवर संघर्ष केला; परंतु त्यांनी कधीही सभागृहाचं पावित्र्य भंग केलं नाही. गणपतराव देशमुख तर सलग ११ वेळा निवडून आलेले आणि एकाही वादग्रस्त वर्तनात न सापडलेले आमदार होते. या सर्व नेत्यांनी कधीही गुन्हेगारांना जवळ येऊ दिलं नाही; विधानभवनात घेऊन जाणं तर दूरची गोष्ट आहे. महाराष्ट्र विधीमंडळाला एवढा गौरवशाली वारसा असताना, तो मोडून विरुद्ध दिशेने सुरू असलेली वाटचाल रोखण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही पुढाकार घ्यावा लागेल.

अधिवेशनकाळात सत्ताधारी पक्षाच्या एका आमदाराने आमदार निवासातील उपहारगृहात कर्मचाऱ्याला मारहाण केली. अनेक आमदारांचे बेफाम वर्तन समोर आले. हे सर्व पाहता या अधिवेशनातून जनतेला काही मिळाले का नाही, हे समजेलच; मात्र महाराष्ट्राच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली.

### गुन्हेगारांना युतीचे महाबळ

सत्ताधारी पक्ष गुन्हेगारीला केवळ संरक्षणच देत नाहीत, तर तिला थेट राजकीय मान्यता देत आहेत. पक्षवाढीच्या नावाने सर्रासपणे गुन्हेगारांना पावन करून घेतले जात आहे. पक्ष विस्ताराचे नव्याने निर्माण झालेले हे मॉडेल लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. नाशिकमधील सुधाकर बडगुजर यांचा भाजप प्रवेश हे या प्रवृत्तीचं अलीकडचं सर्वात धक्कादायक उदाहरण आहे. भारतीय जनता पक्षाने याच बडगुजरवर माफिया डॉनचा सहकारी असल्याचे, आणि थेट दाऊद इब्राहिमशी संबंध असल्याचे गंभीर आरोप केले होते. तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी हे आरोप विधानसभेत केले होते. त्याच फडणवीसांनी मुख्यमंत्री होताच बडगुजरला पक्षात प्रवेश देऊन त्याला क्लीन चिट दिली. भाजपाने नारायण राणे, छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल अशा अनेकांवर आरोप केले आहेत आणि नंतर त्यांना पावन करून संरक्षण व सुरक्षा दिली. जेव्हा गुन्हेगारांना राजसन्मान मिळतो, तेव्हा सर्वसामान्य नागरिक असहाय होतो. जनतेनेही अशा अपप्रवृत्ती स्वीकारल्या, तर राजकारणाचं गुन्हेगारीकरण आणि लोकशाहीचं मरण अटळ ठरेल.

### उलटी गंगा वाहू लागली

एकेकाळी सुसंस्कृत आणि मूल्यनिष्ठ नेतृत्वाची परंपरा लाभलेल्या महाराष्ट्रात, आजच्या सत्ताधाऱ्यांनी ती परंपरा अक्षरशः उद्ध्वस्त केली आहे. जे नेते कधी सभ्यतेचे प्रतीक होते, जनतेच्या प्रश्नांवर अभ्यासपूर्ण भूमिका घेत, मुद्देसूद चर्चा करत, त्यांनी कधीही आपलं वर्तन विधीमंडळाच्या सुसंस्कृतीच्या सीमारेषांपलीकडे नेलं नव्हतं.

पण आज सत्तेच्या हव्यासात, त्याच मंडळींचा वारसा सांगणारे नेतेच गुंडगिरीच्या संगतीत सत्तेचा बेजबाबदारपणे वापर करताना दिसतात. मंत्री नितेश राणे यांची द्वेषमूलक भडकाऊ वक्तव्ये, आ. संजय गायकवाड व आ. गोपीचंद पडळकर यांचे कारनामे ही फक्त काही प्रातिनिधिक उदाहरणं आहेत. सत्तेच्या संरक्षणाखाली वाढलेली एक गुन्हेगारी-राजकीय संस्कृती विकसित होत आहे. विरोधकांना धमकावणं, महिलांविषयी अपमानास्पद बोलणं, सभागृहात अभद्र भाषा वापरणं हे त्या राजकीय संस्कृतीचा भाग झाले आहे. ही फक्त अधोगती नाही, तर महाराष्ट्राची राजकीय सुसंस्कृती संपवण्याचा नियोजनबद्ध कट आहे.

### महाराष्ट्र मार्ग

महाराष्ट्रासारख्या वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध राज्यात सत्ताधाऱ्यांनी राजकारणाचा गुन्हेगारीकृत आणि हिंसक चेहरा पुढे करणे ही केवळ नैतिक अधःपतनाची खूण नाही, तर जनतेच्या आशा-आकांक्षांवर थेट घाव आहे. आज महाराष्ट्राला केवळ सत्ता चालवणारे नव्हे, तर मूल्यांवर उभं राहिलेलं, संयमी, विवेकी आणि उत्तरदायित्व स्वीकारणारं नेतृत्व हवं आहे. विधानमंडळ ही संस्था लोकशाहीची प्रतिष्ठा आहे. तिचा अवमान करणारे कोणत्याही पक्षातले असोत, त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. अन्यथा 'सुसंस्कृत व पुरोगामी महाराष्ट्र' ही ओळख केवळ इतिहासातच उरेल.

गुन्हेगारी हा यशाचा नवा मापदंड आहे, हे जर नव्या पिढीने आत्मसात केलं, तर ही आपल्या राज्याच्या भविष्याची सर्वात मोठी शोकांतिका ठरेल. ही वेळ निर्णायक आहे. आपण कोणत्या महाराष्ट्राचा मार्ग निवडतोय? गोंधळ, गुन्हेगारी आणि सत्तेचा गैरवापर, की शिस्त, तत्त्व आणि सामाजिक भान? याचं उत्तर सत्ताधाऱ्यांनी नाही दिलं, तर जनता नक्कीच देईल.

# कूटनीतीचे यश



पहलगाम हल्ला घडवून आणणाऱ्या 'द रेझिस्टन्स फ्रंट' (टीआरएफ) या पाकिस्तानस्थित 'लष्कर-ए-तैयबा'चा दहशतवादी संघटनेचा एक भाग असलेल्या संघटनेला 'आंतरराष्ट्रीय दहशतवादी' जाहीर करण्याचा अमेरिकेचा निर्णय हे भारताच्या कूटनीतीचे यश म्हणावे लागेल.

पहलगामचा कट पाकिस्तानातच शिजला आणि त्याच्या मदतीनेच तो पार पडला, हे भारताचे म्हणणेही यामुळे उचलून धरले गेले. दहशतवादाच्या विरोधातील लढ्यात आपणही सहभागी असल्याचा दावा करून पाकिस्तानने साळसूदपणाचा आव आणला असला, तरी या निर्णयाद्वारे अमेरिकेने त्याला इशारा दिला आहे.

'टीआरएफ'वर 'आंतरराष्ट्रीय दहशतवादी'' असा शिक्का अमेरिकेने मारल्यानंतर या संघटनेला केली जाणारी आर्थिक आणि अन्य प्रकारची मदत हे गुन्हेगारी कृत्य ठरते; त्यामुळे आता कोणाला 'टीआरएफ'ला मदत करता येणार नाही. यामुळे पाकिस्तानला उघडपणे 'टीआरएफ'ला आश्रय देता येणार नाही. अर्थात, दहशतवाद्यांना लपवून त्यांना मदत करण्याचे तंत्र पाकिस्तानला चांगलेच अवगत आहे. त्यामुळेच 'टीआरएफ'वर बंदी आली असली, तरी देशातील दहशतवादी हल्ले थांबतील, असे नाही. म्हणूनच सुरक्षा व्यवस्थेतही ढिलेपणा राहून चालणार नाही.

भारताच्या विरोधात दहशतवाद्यांकडून छुपे युद्ध पाकिस्तानने सुरू केले त्याला आता तीन दशकांहून अधिक काळ लोटला आहे. 'लष्कर-ए-तैयबा' (एलईटी), 'जैश-ए-महंमद' (जेईएम), 'हिज्बुल मुजाहिदीन' अशा अनेक दहशतवादी संघटनांचे तळ पाकिस्तानात असून, त्यांना तेथील सरकार आणि लष्कर मदत करीत असतात. भारतात मोठा दहशतवादी हल्ला घडल्यानंतर जगभरातून पडसाद उमटल्यावर काही काळ कारवाया थंड होतात. दहशतवादी संघटनांवर बंदीही घातली जाते. मात्र, कालांतराने वेगळ्या नावाने या संघटना हल्ले करतात. 'एलईटी', 'जेईएम' आदींवर बंदी घातली गेली; परंतु त्या वेगळ्या नावाने सक्रिय आहेत. पहलगाम हल्ला घडवून आणणारी 'टीआरएफ' ही 'एलईटी'चाच एक भाग असलेली संघटना. पहलगाममध्ये २६ निरपराधांच्या हत्येनंतर तिने हल्ल्याची जबाबदारीही घेतली.

पाकिस्तान सरकारने हात झटकण्याचा प्रयत्न केला. मात्र, या हल्ल्यातील तिन्ही दहशतवादी पाकिस्तानी असल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे. अशा हल्ल्यांना चोख प्रत्युत्तर देण्याची भाषा करून भारताने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. भारताच्या कारवाईला पाकिस्तानने उत्तर देण्याचा प्रयत्न केला असला, तरी झालेले नुकसान पाहून युद्ध थांबविण्यासाठी विनवणीही केली. मात्र, यानंतरही पाकिस्तानच्या भूमिकेत मोठा बदल झाला नाही. इस्त्रायल-इराण युद्धामुळे अमेरिकेला आपली गरज लागणार हे ओळखून पाकिस्तानने पावले उचलली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही भारत-पाकिस्तान युद्ध आपणच थांबविल्याचा धोशा लावला. शिवाय पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांचे त्यांनी वॉशिंग्टनमध्ये आदरातिथ्यही केले. यामुळे अमेरिकेला आपल्या बाजूने वळविण्यात यश येत असल्याची भावना पाकिस्तानात तयार होत होती. 'टीआरएफ'वरील कारवाईच्या निर्णयामुळे पाकिस्तानला वास्तवाचे भान येऊ शकेल. मात्र, त्यामुळे त्याच्या वर्तनात बदल होण्याची शक्यता नाही.

'टीआरएफ' ही 'एलईटी' किंवा 'जेईएम' यांच्यासारखी जगभर कारवाया करणारी दहशतवादी संघटना नाही. तिच्या कारवाया प्रामुख्याने जम्मू-काश्मीरपुरत्या मर्यादित आहेत. दहशतवादी कारवायांमुळे आर्थिक कारवाई कृतीगटाने पाकिस्तानला करड्या यादीत टाकल्यानंतर 'एलईटी'मधील दहशतवादी 'टीआरएफ'च्या नावाने काश्मीरमध्ये कारवाया करू लागले. गेल्या पाच वर्षांत या संघटनेच्या कारवाया वाढत गेल्या. आता तिच्यावर बंदी आल्याने तेथील दहशतवादी वेगळ्या नावाने पुन्हा संघटित होण्याचा धोका कायम आहे. आजवरचा अनुभव पाहता, असे होण्याची शक्यता अधिक. त्यामुळे दहशतवादी कारवाया रोखण्यासाठी सज्ज राहतानाच पाकिस्तानला जगासमोर उघडे पाडण्याचे धोरण असेच चालू ठेवावे लागेल.

आपल्या भू-राजकीय स्थानाचा लाभ घेऊन अमेरिकेसाठी अनुकूल भूमिका बजावल्याची किंमत पाकिस्तान भारतविरोधी कारवायांद्वारे वसूल करीत आला आहे. अफगाणिस्तानातून अमेरिका बाहेर पडल्यावर त्याची उपयुक्तता कमी झाली होती. शिवाय आर्थिक परिस्थितीमुळे तो अडचणीतही आला होता. आता या परिस्थितीत किंचित सुधारणा होऊ लागल्यावर पाकिस्तान आक्रमक होत आहे. त्यामुळे भारताला सावध राहावे लागेल.

# कारशेड खासगी जागेत... स्थानिकांचा होकार

## एमएमआरडीएला प्रस्ताव सादर करण्याचे आदेश, शेतकऱ्यांची जागा देण्यास तयारी

**■बातमी/लेख, प्रीती दिपक नाईक** : भाईंदर पश्चिमेच्या उत्तन येथील डोंगरी येथील शासकीय जागेमध्ये मेट्रो कारशेड ९ उभारण्यात येणार आहे. या कारशेडमध्ये जवळपास १२ हजार ४०० झाडे तोडावी लागणार आहेत. त्यामुळे पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी उत्तन येथील खोपरा गावातील खासगी जमिनीवर उभारण्यात यावे, यासाठी या जमीन मालकांनी जमिनीचा योग्य मोबदला देऊन जमीन देण्यास तयारी दाखवली आहे. यासाठी जमीन मालकांनी एमएमआरडीए अधिकाऱ्यांना सोमवारी प्रस्ताव दिला आहे. यामुळे पर्यावरणाचे होणारे नुकसान टाळता येईल, असे शेतकऱ्यांनी सांगितले. मेट्रो मार्गिका क्र. ९ दहिसर ते भाईंदर काम सुरू आहे, या मेट्रोसाठी मेट्रो कारशेड हे भाईंदर पश्चिमेच्या उत्तनच्या डोंगरी परिसरातील ५९ हेक्टर शासकीय जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी निश्चित केली आहे. उत्तनच्या डोंगरी येथील शासकीय जागेत मेट्रो कारशेड स्थलांतरित केल्यामुळे त्या ठिकाणी कारशेड उभारताना सुमारे १२ हजार ४०० झाडे तोडण्यात येणार आहेत. यामुळे डोंगरी येथील स्थानिक रहिवासी तसेच पर्यावरणप्रेमींनी या कारशेडला तीव्र विरोध केला आहे. आराखड्यानुसार स्थलांतरित कारशेडची निविदा प्रक्रिया मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून पूर्ण करण्यात आली आहे. मेट्रो कारशेड अन्य ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी मुंबई येथील एमएमआरडीएच्या कार्यालयात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निदेर्शानुसार बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी एमएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त विक्रम कुमार व इतर वरिष्ठ अधिकारी, मीरा-भाईंदर महापालिकेचे आयुक्त राधाबिनोद शर्मा, पर्यावरणप्रेमी धीरज परब, माजी नगरसेवक अजित गंडोली, बॉनी डिमेलो आदी उपस्थित होते.



मीरा-भाईंदर महापालिकेच्या प्रस्तावित मेट्रो-९ ची कारशेड मार्गिका मौजे उत्तन (खोपरा) येथे शेतकऱ्यांच्या मालकीची खासगी जमीन मिळकत १०० एकर आहे. ही जमीन १९९७ च्या विकास आराखड्यातील ४५ मीटर रुंद (१५० फूट) रस्ता, गावाच्या मागील नियोजित आराखड्यात दर्शविण्यात आलेली आहे. त्यामुळे या खासगी जमिनीवर नियोजित मेट्रो-९ कारशेड स्थलांतरित केल्यास ही मार्गिका मोर्वा गावाच्या मागे असलेल्या सरकारी खाजण जमिनीतून नेता येईल. तसेच खासगी जमीन मिळकतीत नियोजित मेट्रो-९ कारशेडचे निर्माण करतांना कोणत्याही प्रकारची वृक्षतोड अथवा पर्यावरणाची हानी होणार नाही.

### योग्य मोबदला देण्यास मंजुरी

उत्तन, खोपरा येथील खासगी जमिनीवर नियोजित मेट्रो-९ कारशेड स्थलांतरित करावे व त्या जागेचा रेडीरेकनर दरानुसार योग्य मोबदला शेतकऱ्यांना देण्यात यावा. या जागेचा योग्य मोबदला मिळाल्यास मेट्रो-९ कारशेडसाठी देण्यास तयार असल्याचा ठराव शेतकऱ्यांनी सवार्नुमते मंजूर करून दिला आहे.

# आता रेल्वेतून कार घेऊन जा थेट कोकणात

**■मुंबई** : कोकण रेल्वेमधून आता कार थेट कोकणात घेऊन जाता येण्यासाठी अभिनव सेवा कोकण रेल्वे प्रशासन सुरू करणार आहे. त्यामुळे यावर्षीच्या गणेशोत्सवात थेट गावाला आपली कार ट्रेनमधून घेऊन जाता येणार असल्यामुळे चाकरमान्यांचा मुंबई-गोवा महामार्गावरचा खडतर प्रवास वाचणार आहे. कोकण रेल्वेने सुरू केलेल्या 'रो-रो' सेवेच्या यशस्वी प्रयोगानंतर, आता थेट प्रवाशांसाठी 'कार ऑन ट्रेन' ही अभिनव सेवा सुरू होणार आहे. मात्र आर्थिकदृष्ट्या ही सेवा महाग असल्यामुळे कोकण रेल्वेच्या 'कार ऑन ट्रेन' या सेवेला किती प्रतिसाद मिळतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

'कार ऑन ट्रेन' ही सेवा येत्या २३ ऑगस्टपासून सुरू करणार असून, यासाठीचे आरक्षण २१ जुलै २०२५ पासून खुले होणार आहे. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव चाकरमान्यांसाठी खऱ्या अर्थाने 'चिंतामुक्त' प्रवासाचा अनुभव देणारा ठरेल. तसेच प्रवास भाडे सुरवातीला कोलाड (महाराष्ट्र) ते वेर्णा (गोवा) दोन्ही बाजूने फक्त अंतिम स्थानकांकरिता ही सेवा सुरू केली जाणार आहे.

या सेवेसाठी प्रत्येक कारसाठी शुल्क ७ हजार ८७५ रुपये असणार असून बुकिंग करताना ४००० रुपये (नोंदणी शुल्क) घेतले जाणार आहेत. उर्वरित रक्कम प्रवासाच्या दिवशी जमा करावी लागणार आहे. तसेच स्वतःची कार असल्यास एकाच वेळी चार ते सहा माणसे प्रवास करू शकतात. यासाठी कारसोबत त्याच गाडीमध्ये तिघांना प्रवास करता येणार आहे. तसेच २ प्रवाशांना ३ टायर एसी कोच मध्ये प्रति प्रवासी ९३५ रुपये तिकीट रक्कम आकारण्यात येणार आहे. तर तिसरा प्रवासी असल्यास त्यास स्लीपर कोच मध्ये सेकंड सीटिंगच्या प्रवास भाड्यात म्हणजे १९० रुपये आकारून प्रवासाची मुभा देण्यात येणार आहे.



### प्रवास कुठून कसा करता येणार?

प्रवासाची वेळ ही सेवा महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील कोलाड ते गोव्यातील वेर्णा दरम्यान उपलब्ध असेल. या सेवेची सुरुवात कोलाड (महाराष्ट्र) येथून २३ ऑगस्ट २०२५ पासून तर वेर्णा (गोवा) येथून २४ ऑगस्ट २०२५ पासून होणार आहे. संध्याकाळी ५ वाजता ही गाडी गोव्याच्या दिशेने रवाना होणार असून ती दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजता वेर्णा येथे पोहचेल. तर परतीच्या प्रवासातही ती वेर्णा येथून संध्याकाळी ५ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजता कोलाड येथे पोहोचेल. प्रवासाच्या आधी तीन तास स्थानकांवर पोहचणे गरजेचे आहे.

'कार ऑन ट्रेन' या सेवेमुळे सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे महामार्गावरचा होणारा मनस्ताप तसेच स्वतः इतक्या ड्रायविंग करत लांब पल्ल्याचा प्रवास टाळता येणार आहे. त्यामुळे गणेशोत्सव कालावधीत रेल्वेच्या या कार वाहतूक सेवेला चांगला प्रतिसाद मिळण्याचे अपेक्षा आहे. मात्र आर्थिक दृष्ट्या ही सेवा परवडण्यासारखी नाही. कारण कारने गेल्यास दहा ते बारा हजार रुपयांचे इंधन लागते. तसेच एकाच वेळी पाच ते सहा वेळा कोकणात जाऊन येता शकतात. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या महाग असलेल्या या सेवेला नोकरदार वर्ग कसा प्रतिसाद देतात? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# बेकायदेशीर स्कूल व्हॅनचालकांवर कारवाई



**■ठाणे** : बेकायदेशीरपणे विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी स्कूल व्हॅन चालकांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. प्रादेशिक परिवहन विभाग आणि ठाणे वाहतूक पोलिसांच्या संयुक्त कारवाईत गेल्या सहा दिवसांत २०२ वाहनांची तपासणी करण्यात आली असून, त्यातील ४७ वाहने कोणत्याही वैध परवाना आणि सुरक्षिततेच्या निकषांशिवाय विद्यार्थी वाहतूक करत असल्याचे उघड झाले आहे. शालेय वाहतुकीसाठी आवश्यक असलेल्या प्रथमोपचार पेटी, जीपीएस यंत्रणा, योग्य आसनव्यवस्था, फिटनेस प्रमाणपत्र यांसारख्या आवश्यक सुविधा अनेक वाहनांमध्ये नव्हत्या. काही वाहनांमध्ये विद्यार्थ्यांना कोंबून नेले जात असल्याचेही निरीक्षण करण्यात आले. वागळे इस्टेट, कोपरी, घोडबंदर, माजिवडा आणि कळवा परिसरात सकाळच्या वेळी विशेष पथकाने तपासणी मोहीम सुरू केली आहे. ही मोहीम प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील आणि वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली जात आहे.

"विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. बेकायदेशीर वाहने चालवणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई केली जात आहे आणि ही मोहीम सातत्याने सुरू राहणार आहे."
**-रोहित काटकर, अधिकारी उप प्रादेशिक परिवहन**

# रायगडमधून धक्कादायक बातमी, ८९ कोटींचे ड्रग्ज जप्त

**■अलिबाग** : रायगड जिल्ह्यात अॅन्टी नार्कोटिक्स ब्रांचने मोठी कारवाई केली आहे. महाड एमआयडीसी हद्दीत एका बंद कंपनीत छुप्या पद्धतीने ड्रग्जची निर्मिती केली जात होती. ही माहिती मिळाल्यानंतर एनसीबी आणि रायगड पोलिसांनी संयुक्त कारवाई केली आणि तब्बल ८८ कोटी ९२ लाखांचा केटामाईन हा अमली पदार्थ जप्त केला. महाड तालुक्यातील जिते गावात हे काम सुरू होते. पोलिसांनी या प्रकरणी मच्छिंद्र तुकाराम भोसले (जिते, महाड), सुशांत संतोष पाटील (माहोप्रे, महाड), शुभम सदाशिव सुतार (नांगलवाडी, महाड, मूळ कोल्हापूर) आणि रोहन प्रभाकर गवंस (मालाड, मुंबई) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही महिन्यांपासून रायगड जिल्ह्यात ड्रग्जचा व्यापार वाढल्याचे दिसत आहे. मुरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीत काही दिवसांपूर्वी १५ लाखांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले तर पनवेल रेल्वे स्टेशनमध्ये बेंगळुरू ठउइ पथकाने नायजेरियन महिलेला अटक करून तिच्याकडून ३५ लाखांचे ड्रग्ज हस्तगत केले होते. या घटना ताज्या असतानाच महाडमधील रोहन केमिकल्सवर कारवाई करण्यात आली. या कंपनीत छुप्या पद्धतीने अमली पदार्थांचे उत्पादन घेतले जात होते. त्यानंतर केटामाईनचा साठा मुंबईसह इतर राज्यांमध्ये साखळी पद्धतीने पाठवला जात होता. यामुळे महाड एमआयडीसी क्षेत्रासह जिल्ह्यातील आणखी काही कंपन्या संशयाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

काही कारणास्तव अनेक वर्षांपासून बंद पडलेल्या रोहन केमिकल्स या कंपनीत कुणालाही पत्ता लागू न देता केटामाईनचे उत्पादन घेतले जात होते. महाड एमआयडीसीमधील प्लॉट नंबर ई-२६/३ मध्ये रोहन केमिक्ल कंपनी आहे. कंपनीच्या प्रांगणात हे बेकायदा काम केले जाते. या ठिकाणाहून ३४ किलो केटामाईन पावडर आणि १३ किलो लिक्विड केटामाईन जप्त करण्यात आला. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे आणि माणगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी यांच्या पथकाने ही कारवाई केली. यात महाड एमआयडीसी पोलीस ठाणे, पोलादपूर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग आणि एनसीबी यांचा सहभाग होता. या कारवाईबाबत कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी कारवाई पथकाचे कौतुक केले आहे.



# जेएनपीए चॅनेल १५ ऑगस्टपासून बंद करणार

## हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांच्या इशाऱ्याचा अर्थ काय

**■उरण** : रायगड जिल्ह्यामधील उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांचे (शेवा कोळीवाडा) ४३ वर्षांनंतरही पुनर्वसन करण्यात आलेले नाही तसेच गावातील ग्रामपंचायत बेकायदा असून ती तातडीने बंद करावी, या मागण्यांसाठी शेवा ग्रामस्थांनी जेएनपीए चॅनेल बंद करण्याचा इशारा दिला आहे. हे आंदोलन १५ ऑगस्टपासून केले जाणार आहे. विशेष म्हणजे असेच आंदोलन ग्रामस्थ यंदा जानेवारीमध्ये करणार होते. मात्र, केंद्रीय मंत्री सबानंद सोनोवाल यांनी आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा केली आणि पुनर्वसन प्रक्रिया ३ महिन्यांत पूर्ण करण्याची ग्वाही दिली दिली होती. त्या बैठकीला जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष वाघ, रायगडचे अतिरिक्त जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपजिल्हाधिकारी भरत वाघमारे, एसडीओ पनवेल पवन चांडक उपस्थित होते. मात्र, चर्चेनंतर कृती न झाल्याने प्रकल्पग्रस्त पुन्हा आंदोलनाच्या पवित्र्यात उभे राहिले आहेत.

आताचे जेएनपीए म्हणजे आधीच्या जेएनपीटीने प्रकल्प विस्ताराच्या नावाखाली शेवा गावाला विस्थापित केले आणि गावकऱ्यांना दिलेली आश्वासने हवेत विरून ग्रामस्थांना संक्रमण शिबिरात कायम ठेवले. तेव्हापासून प्रकल्पग्रस्त पुनर्वसनासाठी संघर्ष करत आहेत. यामुळे इथला कोळी समाज असुरक्षित आणि अमानवी परिस्थितीत जगत आहे. या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी जेएनपीए चॅनेल बंदचा इशारा त्यांनी दिला आहे. वास्तविक या संदर्भात जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी १८ जुलैच्या पत्रातून उपविभागीय अधिकारी आणि उरणच्या तहसीलदारांना बैठक घेण्यास सांगितले आहे. मात्र, निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांचा असल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घ्यावी, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. त्यामुळेच ते आंदोलन करण्यावर ठाम आहेत. तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी १२ मार्च १९८७ रोजी अधिसूचना काढून १७ हेक्टर जमीन पुनर्वसनासाठी दिली होती. मात्र, त्यापैकी १५ हेक्टर जमीन २८ सप्टेंबर २०२२ रोजी अधिसूचना काढून वन विभागाला देण्यात आली. त्यासाठी आधीची अधिसूचना रद्द करण्यात आली नाही. जिल्हा प्रशासनाकडे हनुमान कोळीवाडा महसुली गावाचे दस्तावेज नसल्याने हनुमान कोळीवाडा ग्रामपंचायत कायद्यानुसार नसल्याने ती कायमची बंद करावी तसेच बेकायदा पाणीपट्टी वसुली थांबवावी, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेने केली आहे.



### विस्थापितांचे प्रश्न

- हनुमान कोळीवाडा (शेवा गाव) ग्रामस्थांचे ४३ वर्षांत पुनर्वसन नाही
- १७ हेक्टरवर पुनर्वसन करणार सांगून अभिलेखाचे कागदपत्रे दिली नाहीत
- शेवा गावातील २५६ कुटुंबे आजही प्राथमिक सुविधांना मुकलेलेच
- विस्थापितांना आठवड्यातून एकदाच तेही एक तास पाणीपुरवठा

### केंद्रीय मंत्र्यांचे आश्वासन हवेत विरले

वास्तविक केंद्रीय बंदर मंत्री सबानंद सोनोवाल यांनी तीन महिन्यांच्या आत कॅबिनेटची मंजुरी घेवून जेएनपीएची जमीन देण्याचे दिलेले आश्वासन २२ जानेवारी २०२५ रोजी दिले होते. ते आश्वासन ३१ मे २०२५ पर्यंत पूर्ण करणार असल्याचे जेएनपीएच्या अध्यक्षांनी लेखी कबूल केले होते, ते त्यांनी जुलै २०२५ पर्यंत पूर्ण केलेले नाही. उरणच्या तहसीलदारांनी १६ मे २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या अहवालात ४० वर्षांपूर्वी विस्थापितांना दिलेली ०.९१.२४ हे. आर. जागा अपुरी असल्याचे तसेच त्यामुळे त्यांच्या वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक आणि आरोग्यावर परिणाम झाल्याचे नमूद केले आहे, असा दावा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेने त्यांच्या प्रसिद्धी पत्रकात केला आहे.

तसेच महसुली मिळकतीचे अधिकार अभिलेखाची कागदपत्रे नसल्याने १९९२ मध्ये स्थापन करण्यात आलेली हनुमान कोळीवाडा ग्रामपंचायत बंद करण्याचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी १३ ऑगस्ट २०२४ रोजी घेऊनही ग्रामपंचायत सुरू असल्याकडे शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेने सरकारकडे लक्ष वेधले आहे.

### कांदळवनाची जमीन लाटण्याचा कंपनीचा डाव फसला

# अलिबाग तालुक्यातील ती कंपनी कोणती

**■अलिबाग** : रायगड जिल्ह्यात अलिबाग तालुक्यातील जुई बापूजी गावातील सर्व्हे नंबर ५०/ड या सरकारी कांदळवनयुक्त जमिनीचा सातबारा रद्द करून तो जेएसडब्ल्यू कंपनीच्या नावे करण्यात आला होता. याबाबतचे प्रकरण न्यायालयात असताना तत्कालीन तहसीलदारांनी जून २०२१ मध्ये सातबारा कंपनीच्या नावे केला होता. याविरोधात वन विभाग आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून या जमिनीचा सातबारा पुन्हा सरकारच्या नावे करण्यात आला आहे.

ही माहिती अलिबागमधील सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांना मिळताच त्यांनी १३ सप्टेंबर २०२१ रोजी अलिबागचे उप वनसंरक्षकांची भेट घेतली आणि कांदळवनाच्या जमिनीचे रक्षण करण्यासाठी वन विभागाने तातडीने अपील दाखल करावे, यासाठी पत्र दिले. शहाबाजमधील शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष द्वारकानाथ पाटील यांनीही असेच पत्र ग्रामस्थांकडून उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले आणि कांदळवनाच्या जमिनीचे रक्षण करण्याची मागणी केली होती. त्यानंतर वन विभागाने या प्रकरणात अपील दाखल केले.

या अपीलावर अलिबागचे तत्कालीन उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे यांनी १४ फेब्रुवारी २०२३ रोजी ३ जून २०२१ रोजीचा आदेश रद्द केला. परिणामी कांदळवनाची जमीन पुन्हा सरकारकडे येण्याचा मार्ग मोकळा झाला होता. प्रत्यक्षात उपविभागीय अधिकाऱ्यांच्या आदेशाला दोन वर्षे उलटून गेली तरी सातबारा जेएसडब्ल्यू कंपनीच्या नावे होता. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते सावंत यांनी पुन्हा पाठपुरावा केल्यानंतर तहसीलदार विक्रम पाटील यांच्या आदेशाने अखेर ३ जुलै २०२५ रोजीच्या फेरफार क्र. ९६३ अन्वये मंडळ अधिकारी पोयनाड यांनी जेएसडब्ल्यू कंपनीच्या नावे असलेला सातबारा पुन्हा सरकारच्या नावे पुनर्स्थापित केला आहे. वास्तविक कांदळवन जमिनीबाबत कोणताही निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या परवानगीशिवाय घेता येणार नाही. तरीही अलिबाग तालुक्यात ही विचित्र घटना घडली होती.



जुई बापूजी गावातील सर्व्हे नंबर ५०/ड या सरकारी कांदळवनयुक्त जमिनीवर जेएसडब्ल्यू स्टील कंपनीच्या अतिक्रमण आणि कांदळवन तोडीचा खटला न्यायालयात प्रलंबित होता. तरीही तत्कालीन तहसीलदारांनी ३ जून २०२१ च्या आदेशाने जेएसडब्ल्यू कंपनीच्या अर्जावरून सरकारी राखीव कांदळवन जमीन वनविभाग आणि रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांना अंधारात ठेवून जेएसडब्ल्यू कंपनीच्या नावावर करण्याची हिंमत केली होती. तसा सातबाराही कंपनीच्या नावे केला होता. तहसीलदारांचा हा आदेश चार महिने कोणत्याच वरिष्ठ कार्यालयाला ठावून नव्हता.

# "तुम्ही जरा थांबा" बोलल्याने परप्रांतिय तरुणाकडून मराठी मुलीला बेदम मारहाण

**■कल्याण** : कल्याणमधील नांदिवली परिसरात एका खाजगी रुग्णालयात काम करणाऱ्या मराठी तरुणीला परप्रांतीय नशेखोर तरुणाने बेदम मारहाण केल्याचा आणि विनयभंग केल्याचा संतापजनक व्हिडिओ समोर आला आहे. केवळ ''तुम्ही जरा थांबा'' एवढं सांगितल्यामुळे आरोपीने तिला पोटात लाथ मारली, केस ओढून फरपटत नेलं आणि तिचा विनयभंग केला. ही धक्कादायक घटना सिसिटीव्हीत कैद झाली असून परिसरात तीव्र संतापाचं वातावरण निर्माण झालं आहे. आरोपीचे नाव गोपाल झा असे आहे. तर, पीडित तरुणीचे नाव सोनाली प्रदीप कळासारे असून ती कल्याण पूर्वेतील श्री बाल चिकित्सालयात रिसेप्शनिस्ट म्हणून काम करते.



मनसेने या प्रकरणी मंगळवारी (२२ जुलै) मानपाडा पोलीस ठाण्यात भेट दिली. मनसेचे पदाधिकारी अरुण जांभळे आणि इतर अनेक मनसे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना विचारणा केली की, रुग्णालयातील तरुणीला मारहाण करणाऱ्या त्या तरुणाला अजून अटक का करण्यात आलेली नाही? यावेळी पत्रकारांशी बोलताना अरुण जांभळे म्हणाले, ह्या घटनेला २४ तास उलटून गेले आहेत, तरीही त्या गुन्हेगाराला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. मनसैनिकही त्या तरुणाचा शोध घेत आहेत. तो मिळाल्यास त्याला आम्ही स्वतः पोलिसांच्या ताब्यात देऊ.ह्व

सोमवारी (२१ जुलै) सायंकाळी ६.४५ दरम्यान ही घटना घडली. सोनाली नेहमीप्रमाणे आपली ड्यूटी करत होती. डॉक्टरांच्या केबिनमध्ये एमआर बसले होते. यासाठी तिने काही पेशंटला थोडा वेळ थांबण्यास सांगितले. व्हिडिओमध्ये दिसतंय, की ती एका व्यक्तीला "तुम्ही जरा थांबा" म्हणत आहे. तितक्यात बेधुंद नशेत असलेला गोपाळ झा रागात येतो आणि सोनालीच्या पोटात जोरात लाथ मारतोय. सोनाली पाठी असलेल्या टेबलवर आपटते. तो इतक्यावरच थांबत नाहीये तर तिचे केस धरून तिला जमिनीवर आपटतोय. शिवीगाळ करत, कपडे फाडत तिचा विनयभंगही करताना व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसतंय.या अमानुष मारहाणीने सोनालीला शारीरिक आणि मानसिक धक्का बसला असून, तिला पायावर उभंही राहता येईना अशी अवस्था झाली.

# ब्लिंकिटचा डिलिव्हरी बॉय पार्सल द्यायला आला

## लिफ्टमध्येच लघुशंका करून गेला... वास आल्यानंतर....

**■विरार** : विरार पश्चिमेतील सीडी गुरुदेव बिल्डिंगमध्ये ब्लिंकिट कंपनीच्या एका डिलिव्हरी बॉयने लिफ्टमध्ये लघुशंका केल्याचा लज्जास्पद प्रकार उघडकीस आला आहे. १८ जुलै रोजी घडलेली ही घटना इमारतीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, सध्या तिचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. डिलिव्हरी बॉयचे घाणेरडे वर्तन पाहून सोसायटीतील रहिवाशांनी आणि नेटकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

### दुर्गंधीमुळे प्रकार उघडकीस

ही घटना १८ जुलै रोजी दुपारी घडली होती. मात्र, संध्याकाळपर्यंत लिफ्टमध्ये दुर्गंधी आणि अस्वच्छता जाणवू लागल्याने काही रहिवाशांना शंका आली. त्यानंतर लिफ्टमधील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

### संतप्त रहिवाशांची ब्लिंकिट कार्यालयात धडक

या प्रकारामुळे संतप्त झालेल्या रहिवाशांनी ब्लिंकिट च्या जवळील कार्यालयात जाऊन संबंधित डिलिव्हरी एजंटची ओळख पटवत त्याला जाब विचारला. त्याला चोप देत पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणी रहिवाशांनी बोळींज पोलीस ठाण्यात डिलिव्हरी बॉय विरुद्ध तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी या घटनेची पुष्टी केली असून सध्या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. ब्लिंकिट कंपनीकडून यावर अद्याप कोणतेही अधिकृत वक्तव्य करण्यात आलेले नाही.



### कॅमेऱ्यासमोर पाठ फिरवून लघुशंका

सीसीटीव्ही फुटेजमध्ये संबंधित डिलिव्हरी बॉय हातात पार्सल घेऊन लिफ्टमध्ये प्रवेश करताना दिसतोय. काही क्षणांत तो कॅमेऱ्याकडे पाठ फिरवतो आणि लिफ्टच्या एका कोपऱ्यात लघुशंका करतो. हा प्रकार पूर्णतः जाणूनबुजून केल्याचं स्पष्ट दिसतंय. कारण तो कॅमेऱ्यापासून लपण्याचा प्रयत्नही करताना दिसतोय.

### ब्लिंकिट कंपनी

ब्लिंकिट ही एक भारतीय क्विक-कॉमर्स सेवा आहे. ही कंपनी ग्राहकांना किराणा व दैनंदिन आवश्यक वस्तू १० मिनिटांत घरपोच पोहोचवते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com